# 'निवडक मराठी कादंबरी' या ग्रंथाचे कुलगुरु डॉ. उध्दव भोसले यांच्या हस्ते विमोचन

देशोन्नती वृत्तसंकलन...

देगलूर ■ मराठी अभ्यास मंडळाचे क्रमिक पाठ्य- पुस्तक 'निवडक मराठी कादंबरी' हे कोरोनाजन्य आवाहनात्मक परिस्थितीत विद्यार्थ्यांना आणि



वाचकांना उमेद जागविणारे, वाचनसंस्कृतीस बळ देणारे आणि नवसर्जनशीलतेला चालना देणारे नक्कीच आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अध्यापक आणि अध्ययनकर्ते यांना मराठी साहित्याभ्यासाकरिता आकृष्ट करुन लेखनाचे मूल्यसंस्कार घडविणारे आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांनी केले. ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मराठी अभ्यास मंडळाकडून बी.ए. द्वितीय वर्ष, चतुर्थ सत्रासाठी ऐच्छिक मराठी, अभ्यासपत्रिका- सातवीकरिता नेमण्यात आलेल्या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी बोलत होते. प्रस्तुत पुस्तक निर्मिती करिता संपादकांनी खूप कष्ट घेतले आहेत, प्रकाशकांच्या कल्पकतेमधून ही अव्वल साहित्यकृती निर्माण झालेली असून त्याची सर्वत्र दखल घेतली जाईल, असा विश्वास वाटतो. याबद्दल 'संपादक प्रा. डॉ.विठ्ठल जंबाले यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ.केशव देशमुख यांनी मंडळाच्या गतकालीन घडामोडींचा वृत्तांत कथन केला. आगामी आराखडा सांगितला. यावेळी डॉ. पृथ्वीराज तौर हे उपस्थित होते.

Scanned with CamScanner